## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८२८/२००७.

श्री. सदाशिव भगवान महाले,
मु. पो. कळंबा महाली,
ता. जि. वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी,
जि. वाशिम.

श्री. एस. पी. वायाळ,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी विना अनुमतीने गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी शासकीय जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयामध्ये लोकशाही दिन दिनांक १.२.२००६ रोजीच्या अर्जदाराचे तक्रारीबाबत माहिती मिळणेबाबत. माहितीचा कालावधी दिनांक ३.७.२००६ ते दिनांक १.९.२००६ असा आहे. माहितीचे वर्णन अर्जदाराचे दिनांक ३.७.२००६ रोजी मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे नदीला आलेल्या महापुरामुळे अर्जदाराचे घराचे अतोनात नुकसान झाले आहे. त्याबद्यल अर्जदारास शासनाच्या निकषाप्रमाणे आर्थिक सहाय्य तहसील कार्यालय, वाशिम कडून देण्यात आले नाही म्हणून अर्जदाराने तहसीलदार, वाशिम यांना

... २

दिनांक १०.७.२००६ रोजी विनंती अर्ज केला तरी सहाय्य दिले नाही. त्यामुळे अर्जदाराने लोकशाही दिनी दिनांक १.९.२००६ रोजी तक्रार दिली त्यामध्ये जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार, वाशिम यांना उत्तर देण्याचे आदेश दिले. अद्याप तहसीलदार, वाशिम यांनी उत्तरही दिले नाही व आर्थिक सहाय्यही दिले नाही. म्हणून तहसील कार्यालयातर्फे झालेल्या कार्यवाहीचा व उत्तराची माहिती अर्जदारास देण्यात यावी. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु सदरचा अर्ज हा जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दिल्याची पोच दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३१.१.२००७ रोजी आयुक्त, अमरावती (महसूल विभाग) यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १५.३.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहावे असे अपीलकर्ता यांना कळविल्याचे दिसून येते. परंतु दिनांक २६.३.२००७ रोजी अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वाशिम यांचे कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अंतर्गत अर्ज न केल्यामुळे अपीलीय अधिकारी यांनी त्यांची अपील खारीज करुन त्याबाबत झालेला निर्णय अपीलार्थी यांना दिनांक २६.३.२००७ रोजी कळविला होता असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांचा तपशिल म्हणून मा.जिल्हाधिकारी, वाशिम, मा. तहसीलदार, वाशिम असा तपशिल दिलेला आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांना तहसीलदार, वाशिम यांनी लोकशाही दिन दिनांक ५.१२.२००६ तसेच माहितीचा अधिकाराचा अर्ज, त्यामध्ये तहसीलदार, वाशिम यांनी कोणतीही जबाब अर्जदाराच्या अर्जावरुन न दिल्यामुळे व पुरग्रस्त म्हणून अर्जदारास डावलल्याबद्यल. तसेच तहसीलदार यांनी मा.जिल्हाधिकारी यांना कोणतीही माहिती न पुरविल्याबद्यल व तसेच जिल्हाधिकारी, वाशिम यांनी लोकशाही दिनातील अर्जदाराच्या अर्जावर व माहितीचे अधिकारातील अर्जावर कोणताही आदेश न दिल्यामुळे व आयुक्त, अमरावती यांनी अपीलात कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपीलार्थी हे अपील दाखल करीत आहे असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांची थोडक्यात माहिती अशी आहे की, मुसळधार पावसाने अर्जदाराचे घरातील जिवनावश्यक वस्तु, अन्नधान्य, शेतीपयोगी अवजारे व बांधकाम करण्याचे साहित्य पुरात वाहून गेले व अन्नधान्याचे नुकसान झाले. नुकसानीचा अहवाल

तलाठी कळंबा महाली यांनी तहसीलदार, वाशिम यांना सादर केला. अपीलार्थीचे शेजारी लोकांना तहसीलदार, वाशिम यांनी पुरग्रस्त निधीतून अनुदान वाटप केले. परंतु अपीलार्थीस अनुदान वाटप केले नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी लोकशाही दिनात तक्रार अर्ज सादर करुन त्यासोबत माहितीचा अर्ज हा जिल्हाधिकारी, वाशिम यांना दिला व त्यामुळे सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे अर्ज दिलेला आहे त्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात झालेली दिसून येत नाही. सदरचा अर्ज हा तहसीलदार यांना उद्येशून नसल्यामुळे तहसील कार्यालयात त्याची नोंद झालेली दिसून येत नाही व सदरचा अर्ज हा अनुत्तरीत राहिला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे अर्ज हा रितसर जिल्हाधिकारी कार्यालयात द्यावयाचा असतो. लोकशाही दिनात अशा प्रकारचा अर्ज दिल्यास त्याची दखल घेतली जाईल असे नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे अपील केल्यानंतर विभागीय आयुक्त हे सुध्दा अपीलीय अधिकारी नसल्यामुळे ते उपविभागीय अधिकारी यांचेकडे हस्तांतरण करण्यात आलेला दिसतो. कोणतेही अपील हे माहितीचा अर्ज हा जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतरच करता येते व त्यामुळेच तहसीलदार तथा जनमाहिती अधिकारी यांच्याकडे कोणताच अर्ज केलेला नसल्यामुळे उपविभागीय अधिकारी यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांची माहिती ही तहसील कार्यालयात असल्यामुळे त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे अर्ज केला असता तर त्यांना त्यांची नुकसान भरपाईच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली ही माहिती मिळाली असती. राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा दाखल केलेल्या द्वितीय अपीलात वर नमुद केल्याप्रमाणे त्यांचेच म्हणणे आहे की, माहिती अधिकाराचा अर्ज हा त्यांनी लोकशाही दिनात दिला होता व तो जिल्हाधिकारी यांच्याकडे दिला व त्यामुळे राज्य माहिती आयोगास सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कोणत्याही अधिकाऱ्यास आदेश देता येत नाही. असे असले तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या प्रतीच्या संदर्भामध्ये जरी ते जिल्हाधिकारी यांना संबोधून असले तरी तहसीलदार, वाशिम यांनी त्यांच्या दिनांक ४.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती ही शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भामध्ये सन २००६ मधील शासन निर्णयाची प्रत हा निर्णय मिळाल्या पासून ३ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ३०.७.२००८**